दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS LAT SWITCHGEAR INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ४ थे अंक १० वा गुरूवार दि.०६ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# माजी मंत्री आ अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थित कॉंग्रेस भवन येथे नूतन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचे जल्लोषात स्वागत

लातूर / प्रतिनिधी :– लातूर लोकसभा मतदारसंघातील कॉंग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार, नूतन खासदार डॉ.शिवाजी काळगे यांचा प्रचंड मताधिक्याने विजय झाला. आज बुधवारदिनांक ५ जून २०२४ रोजी सकाळी लातूर शहरातील कॉंग्रेस भवन येथे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे महाविकास आघाडी सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख,माजी आमदार ईश्वरराव भोसीकर,माजी आमदार रोहिदास चव्हाण,माजी आमदार वैजनाथ शिंदे,माजी आमदार त्रंबक भिसे, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या आशाताई श्यामसुंदर शिंदे,शेकापचे ऍड उदय गवारे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते एकनाथ पवार,बालाजी रेड्डी कॉंग्रेसचे लातूर लोकसभा निरीक्षक अमर जाधव,प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, सचिव अभय साळुंखे,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सोमेश्वर कदम,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे,शहर जिल्हा अध्यक्ष ऍड किरण जाधव,विद्याताई पाटील, महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते लातूरचे नूतन खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे यांचे कॉंग्रेस भवन येथे आगमन झाल्यावर ढोल ताशाच्या गजरात पुष्पवृष्टी करून जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विजयाचे लाडू वाटून फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. लातूर लोकसभा मतदारसंघातील लातूर शहर,लातूर ग्रामीण,अहमदपूर,उदगीर ,लोहा कंधार ,निलंगा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी



कार्यकर्त्यांनी नूतन खासदार डॉ. शिवाजी काळगे व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख,आमदार धीरज विलासराव देशमुख यांचे लातूर लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस महाविकास आघाडीने विजय संपादन केल्याबद्दल अभिनंदन केले. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेला माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व नूतन खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी संबोधित केले.दरम्यान लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी कॉंग्रेसचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचा माजी मंत्री आमदार अमितविलासराव देशमुख,आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की कॉंग्रेस आणि महाविकास आघाडीच्या ध्येय,धोरणाला बांधील राहून नूतन खासदार डॉक्टर शिवाजी काळगे सर्व समाज घटकांच्या हितासाठी कार्यरत राहतील या लोकसभा निवडणुकीत



लातूरसह मराठवाडा, महाराष्ट्र आणि संपूर्ण देशात कॉंग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडीच्या बाजूने जनतेने कौल दिला असून हा कौल संविधान रक्षणासाठी मिळाला असल्याची आपली भावना आहे असे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की मराठवाड्यात महाविकास आघाडीने आठ पैकी सात जागा जिंकल्या असून येथे मिळालेले हे यश लक्षवेधी असल्याचे नमूद करून वाढती महागाई बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या कष्टाचे योग्य मोल मिळतनसल्यामुळे जनतेच्या मनात विद्यमान सत्ताधाऱ्यांबद्दल प्रचंड चीडआहे,मतदानाच्या माध्यमातून जनतेने तो राग व्यक्त केला असल्याचे निवडणूकनिकालावरून दिसून येत आहे. अनेक समस्यांमुळे अडचणीत असलेल्या देशातील जनतेला आधार देण्याचे काम यापुढील काळात इंडिया आघाडी करेल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले की या लोकसभा निवडणूक कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तसेच महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते तसेच आघाडीतील सर्वच घटक पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी या निवडणुकीत जे परिश्रम घेतले, त्याचा परिणाम निवडणूक निकालातून दिसून आला आहे, आघाडीच्या या यशाबद्दल आघाडीचे सर्व नेते , पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे हार्दिक अभिनंदन करून या निवडणुकीत जनतेकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला त्याबद्दलही जनतेचे मनःपूर्वक आभार त्यांनी मानले. यावेळी विजय देशमुख,रवींद्र काळे,संतोष देशमुख, गोरोबा लोखंडे, शिवाजीराव हुडे, लिंबन महाराज रेशमे,अविनाश रेशमे,कल्याण पाटील,सुनील बसपुरे, सुनील पडीले,विष्णुपंत साठे,प्रा.शिवाजी मुळे, बालाजी कदम,चंद्रकांत ठेंगेटोल,शरद पवार, ऍड.समद पटेल,श्याम भोसले,डॉ. अशोक पोद्दार, डॉ. सतीश बिराजदार,कल्याण पाटील,शीलाताई पाटील, हमीद शेख,उषा कांबळे,अजित माने, जितेंद्र स्वामी, डॉ. अरविंद भातांब्रे, चांदपाशा इनामदार, प्रवीण सूर्यवंशी, बालाजी पंडागळे, स्वयंप्रभा पाटील,प्रा.स्मिता खानापुरे,सपना किसवे,शितल मोरे, सुलेखा कारेपूरकर, चंद्रकांत मदे, असिफ बागवान,अभिजीत दिघे, महेश काळे,शरद देशमुख, रघुनाथ शिंदे, अकबर माडजे, विष्णुदास धायगुडे, गणेश एस.आर.देशमुख,अनिल पाटील, भैरवनाथ झडके, ऍड.देविदास बोरुळे पाटील, राम स्वामी, संभाजी सुळ, बालाजी साळुंखे, आनंद वैरागे, मीनाताई टेकाळे, शोभा ओव्हाळ,श्रीनिवास शेळके, करीम तांबोळी,किरण बनसोडे,ऍड.अंगद गायकवाड, आदिसह कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, महाविकास आघाडीचे विविध घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिस्थळी डॉ. काळगे यांचे अभिवादन





लातूर / प्रतिनिधी :– लातूर लोकसभा मतदारसंघाचे कॉंग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ शिवाजी काळगे हे बहुमताने विजयी झाल्याबद्दल बाभळगाव येथील विलासबाग येथील लोकनेते, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन डॉ काळगे आणि महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार धिरज विलासराव देशमुख व विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते डॉ. शिवाजी काळगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दीपशिखा धिरज देशमुख, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष ड किरण जाधव, समद पटेल, अनुप शेळके, सुनील पडिले, अभय साळुंके, अजित माने, प्रवीण पाटील, राम स्वामी, इम्रान सय्यद, लातूर तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, रेणापूर तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष प्रमोद जाधव, विजय देशमुख, रविंद्र काळे, एकनाथ पाटील, संभाजी रेड्डी, मदन भिसे, डॉ अशोक पोतदार, डॉ. सतीश बिराजदार, ड निखिल काळगे, गणेश ढगे, विपीन गवरे, विष्णूदास धायगुडे, ड दीपक राठोड, ओमप्रकाश झुरुळे, सुपर्ण जगताप, संतोष देशमुख, गोविंद देशमुख, गणेश देशमुख, ईश्वरप्रसाद चांडक आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## नागेश आष्टीकर यांच्यासाठी ठरले पोषक वातावरण आमदारकी, ब्रेक अन् थेट दिल्लीत धडक

किनवट / शेख शौकत :– हिंगोली मतदारसंघाचे महाविकास आघाडी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार नागेश आष्टीकर यांनी आमदारकीनंतर आता थेट दिल्लीत धडक मारली आहे. २०१४ च्या निवडणुकीत हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. २०१९ च्या विधान सभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाल्यामुळे त्यांना ब्रेक घ्यावा लागला. मात्र आता थेट खासदार म्हणून ते संसदेत पोहचले आहेत. हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांना डावलून महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार बाबूराव कदम यांना उमेदवारी दिली. त्यामुळे नवखा उमेदवार लादल्याची भावना किनवट, माहूर येथील मतदारांमध्ये निर्माण झाली. तर दुसरीकडे केंद्र व राज्य सरकारबद्दल रोष कायम होता. याचा फटका बाबूराव कदम यांना बसला आणि नागेश आष्टीकर यांच्या विजय झाला. मतदारांचा पुढाकार शिंदे सेनेचे बाबूराव कदम तर उद्धव सेनेचे नागेश आष्टीकर हे दोघेही हदगाव तालुक्यातील होते. महायुतीच्या उमेदवाराचा थेट संपर्क आला नव्हता. तर दुसरीकडे आष्टीकर यांच्यासाठी मतदारांनीच पुढाकार घेतला होता. वंचित बहुजन आघाडीचे डॉ. बी. डी. चव्हाण




यांचा पाहिजे तसा मतदारांवर प्रभाव पडला नाही. २०१९ मध्ये किनवटमधून लिड २०१९ मध्ये हिंगोली लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे हेमंत पाटील यांना मिळालेली मते ९२,३८६. कॉंग्रेसचे उमेदवार सुभाष वानखेडे यांना मिळालेली मते ४८,५३१– वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार मोहन राठोड यांना मिळालेली मते १७,२३२. विजयाची कारणे शेतकऱ्यांचे प्रश्न, महागाई मूलभूत प्रश्नांचा समावेश करत महाविकास आघाडीने शेतकयांचे प्रश्न, बेरोजगारी, महागाई प्रकर्षाने मांडले.

शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी संविधान बद्दलण्यावर भाष्य केल्यामुळे हा मुद्दा मतदारांच्या लक्षात राहिला.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी घेतली भेट लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या विजयाबद्दल केले अभिनंदन

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत उदगीर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाचे माजी नगरसेवक शमशोद्दीन जरगर यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला त्यांचे कॉंग्रेस पक्षात स्वागत करून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी लातूर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे,उदगीर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण पाटील,उदगीरच्या माजी नगराध्यक्षा उषाताई कांबळे शहराध्यक्ष मंजूरखा पठाण मोसिन बागवान शमशोद्दीन शेख बालिका मुळे मेहबुब शेख आधीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते

लातूर / प्रतिनिधी :– राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची आज बुधवार दिनांक ५ जून रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी भेट घेऊन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉक्टर शिवाजी



काळगे यांना विक्रमी मताधिक्याने



निवडून आणल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महाविकास आघाडीच्या सर्व नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांनी या निवडणुकीत कठोर परिश्रम घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले यावेळी लातूर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे,निळकंठ मिरकले,आर. डी तेलंग,अभिमन्यू धोंडगे राम बेल्लाळे आदी उपस्थित होते

संपादकीय....

# पवार फिरले निकालही फिरला!

पावलापावलावर येणारी संकटं, राजकीय अस्तित्वापुढेच प्रश्नचिन्ह उभे करणारे शह- काटशह, घनघोर संघर्ष आणि तोही एकाकी, शिवाय त्यातून मिळणारं मर्यादित यश हा शरद पवार यांचा सहा-साडेसहा दशकांचा राजकीय इतिहास आहे. पण पक्षातली फूट कौटुंबिक ऐक्याचाही वेध घेते, तेव्हा जिव्हारी लागलेली जखम घेऊनही आयुष्याच्या मावळतीला पुन्हा त्याच जिद्दीने उभा राहतो तो शरद पवारांसारखा नेता! अशी दुर्दम्य इच्छाशक्ती असलेल्या पवारांना हलक्यात घेऊ नये, हे साधंसोपं राजकीय शहाणपण गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या नेत्यांना नसल्याचा परिणाम व्हायचा तो झाला.दिग्गज म्हणविणाऱ्या मोदी- शाह यांनीच ताळतंत्र सोडल्याने भाजपच्या गल्ली-बोळांतील शेंबड्या पुढाऱ्यांनीही पवारांची यथेच्छ टवाळी केली. केंद्रीय तपासयंत्रणा घरगड्यासारख्या वापरून राज्याराज्यांत नेत्यांना गजाआड केलं. राजकीय पक्ष तोडून फोडून त्यांची लक्तरं रस्त्यारस्त्यांवर टांगली. न्यायालयांच्या निष्पक्षपातीपणावर गदा आणण्याचा प्रयत्न केला. निवडणूक आयोगाचा खेळखंडोबा केला. सत्तेची सूत्रं हातात ठेवण्यासाठी ऊतमात, बेदरकारपणे केला. लोक हे उघड्या डोळ्यांनी पहात होते; तरीही ते जातात कुठे, इतकं त्यांना गृहीत धरलं होतं.

शिवसेना, राष्ट्रवादी हे पक्ष फोडले. काँग्रेसचे नेते गळाला लावले. म्हणजे आता ते संपलेच अशा थाटात भाजपवाले वावरत होते. शिंदे, फडणवीस, पवार या सरकारनं हवे ते निर्णय घेतले. सत्ताधारी आमदार खासदारांच्या मतदारसंघात पाचपाचशे आणि हजारहजार कोटी रुपयांची कामं काढली. गावागावात गल्लीबोळात कामं काढली म्हणजे लोक झक्कत आपल्या आमदार खासदारांना निवडून देतील, असं गृहीत धरून शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलं. मध्यम आणि उच्चमध्यमवर्गाला खूश करण्यासाठी कांद्याच्या आयात-निर्यातीसंबंधात पक्षपाती धोरणं राबविली. राज्यातले उद्योगधंदे गुजरातकडे वळविले. पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची गाजरं दाखवून बेरोजगार तरुण भुलतील; गारपीट, अवकाळी आणि दुष्काळात होरपळणारे लोक चार तुकडे टाकले की आपल्याच मागं धावतील; धर्माच्या अफूनं लोक कायम वेडेपिसे होतील; जात धर्माच्या राजकारणानं कायम पिसाट होतील अशा तोऱ्यात सत्ताधारी होते. राज्यात असंतोष खदखदत होता. पवार आणि यांच्यावर भाजपची टोळधाड तुटून पडायची. बावनकुळे इतकंच काय पण ज्यांची नावंही घ्यायच्या लायकीचे नाहीत, ते गल्लीबोळातील ते शेंदाड शिपाईसुद्धा वाट्टेल तसा पाणउतारा करायचे. हे सगळं वर्तमानपत्रं ठळकपणे छापायची. इलेक्ट्रॉनिक माध्यमं 'ब्रेकिंग' म्हणून त्याची पारायणं करायची. याचा प्रतिवाद एकटे संजय राऊत करायचे. पण त्यांचंही वस्त्रहरण माध्यमांत व्हायचं. तरीही पवार आणि उद्धव मात्र पायाला भिंगरी लावल्यागत महाराष्ट्रभर फिरत राहिले. पक्ष गेला, नाव गेलं, चिन्ह ओरबाडलं, दुसऱ्या तिसऱ्या फळीतले नेतेही गेले तशाही अवस्थेत ते कशाचीही पर्वा न करता लोकांना थेट भिडले. तेव्हा लोक आणि विशेषत: तरुण या एकाकी योद्ध्यांमागे धावू लागले.

भेटीगाठींतून राजकीय बेगमी निवडणुका जाहीर होण्याआधी पंतप्रधानांनी दौऱ्यांचा सपाटा लावला. जिल्ह्याजिल्ह्यांत विकासकामांचे नारळ फोडले. रकानेच्या रकाने भरून जाहिराती दिल्या. रोजच्या रोज विरोधकांची हेटाळणी, टिंगळटवाळी ठरलेली होती. पंतप्रधानांच्या पाठोपाठ समाजमाध्यमांतून ट्रोल-धाडी पडायच्या. या सगळ्या गोंधळ- गदारोळात पवारांनी आपल्या रणनीतीला आकार द्यायला सुरुवात केली. जिल्ह्याजिल्ह्यांतल्या लोकांना भेटायला सुरुवात केली. काही विश्वासातल्या मोहऱ्यांना त्यांनी छोट्यामोठ्या जबाबदाऱ्या दिल्या. पण याची खबर या कानाची त्या कानाला नव्हती. समजा लागली तरी त्यातून काय हाती लागणार, असाच समज व्हायचा. या सगळ्या दौऱ्यांमध्ये एक दिवस अचानक ते वाकडी वाट करून अकलूजला विजयदादांच्या प्रकृतीची विचारपूस करायला गेले. याची ठेच भाजपच्या नेत्यांना लागली खरी; पण पवारांनी माढ्याचं गणित जुळवलं याची कल्पना मात्र त्यांना आली नाही. कोल्हापूरचे संभाजीराजे हे राज्यात बऱ्याच उचापत्या करत होते. त्याकडे काणाडोळा करून पवार शाहू महाराजांना भेटले. माढ्यापाठोपाठ कोल्हापूरची तटबंदी मजबूत केली. एकदा असेच ध्यानीमनी नसताना अमरावतीला गेले आणि बच्चू कडू यांचा पाहुणचार घेतला. यातील अनेकांचे लागेबांधे सत्ताधाऱ्यांशी होते. काहींनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिली होती. त्यांनाही त्यांच्या नकळत कामाला लावले. विजयदादा मोहिते आणि सुशीलकुमार शिंदे यांचं सोलापूरच्या राजकारणात विळ्या-भोपळ्याचं सख्य. त्यांचीही एक अंगतपंगत पवारांनी घडवली. त्यातून पुढे सोलापूर जिल्हा आघाडीला सुकर झाला. एकदा पवारांनी अचानक महादेवराव जानकरांना माढ्याची गळ घातली. जानकरांनी बारामतीत सुप्रिया सुळे यांच्याशी दोन हात केले होते. तसे भाजपवाले खडबडून जागे झाले. त्यांनी जानकरांना परभणीला नेलं. इकडे उत्तमराव जानकर माढ्यात आघाडीच्या दिमतीला आले. जानकर परभणीला गेले खरे, पण म्हणतात ना, जगात जर्मनी आणि मराठवाड्यात मराठा आरक्षण : कुणाचा खेळ? मराठा आरक्षणाचा मोठा खेळ रंगला होता. हे आंदोलन राज्यभर उभं राहावं, अशी भाजपची रणनीती होती. त्यातून साहजिकच मराठा-ओबीसींत ठिणगी पडणार होती. या जातीय ध्रुवीकरणाचा लाभ भाजपला होणार होता. भाजपची ही खेळी जबरदस्त होती. जरांगे पाटलांना परभणी-जालन्याबाहेर कोणी ओळखत नव्हतं. त्यांच्या उपोषणादरम्यान पोलिसांनी बेछूट लाठीमार केला. राज्यभरातले मराठे संतापून उठले. ओबीसींच्या कोट्यातूनच आरक्षण मिळालं पाहिजे, या मागणीला जोर चढला. संभाजी ब्रिगेडनं त्याला विरोध केला. पण त्यांचं कोण ऐकतो? लाखालाखांच्या संख्येने मराठे बाहेर पडले. जेसीबीतून फुलपाकळ्यांचा वर्षाव सुरू झाला. रातोरात जरांगे मराठ्यांचे अनभिषिक्त सम्राट झाले. तसे ओबीसी नेते छगन भुजबळ सात्त्विक संतापाने पेटून उठले. सुरुवातीला जरांगेंची भाषा भुजबळ साहेब वगैरे अशी होती. तेव्हा भुजबळांमधल्या मुरब्बी राजकारण्याने त्यांना उचकवायला सुरुवात केली. तसे जरांगे बिथरले आणि आपोआप मराठा विरुद्ध ओबीसी अशी धार आली. भाजपचं काम फत्ते झालं होतं. त्यांची ओबीसी व्होट बँक मजबूत झाली. आणि बिथरलेले मराठे बहिष्काराची भाषा बोलू लागले. त्यात प्रकाश आंबेडकरांनी जरांगे यांना एकतर्फी पाठिंबा जाहीर केला. विरोधकांचा कडेलोट करण्याची परफेक्ट रणनीती आकाराला येत होती. तथापि, पवार नामक मुरब्बी राजकारण्याला याची आधीच टोटल लागली होती. त्यामुळे लाठीमार झाल्याझाल्या पवारांनी जरांगे यांना भेटून कुरवाळलं! फडणवीस, भुजबळ आणि आंबेडकर कामाला लागले होते, तसेच काही लोक पवारांनीही पेरले होते. पुढे काय झालं, ते आपण पाहतोच आहोत.अजितदादांची अस्वस्थता पवारांच्या जिव्हारी लागलं होतं ते अजितदादांचं बंड. भाजपने बारामतीच्या बालेकिल्ल्यालाच भगदाड पाडलं नव्हतं तर पवार नामक कौटुंबिक जिव्हाळ्यातही बिब्बा घातला होता. अजितदादांनी पत्नी सुनेत्राताईंनाच उभं केलं पाहिजे, असं दडपण होतं. या खेळीतून सुप्रिया सुळेंचा पराभवच नव्हे तर साठपासष्ट वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणात मुरलेल्या पवार यांचंच नाक कापण्याची भाजपची सुप्त इच्छा होती. वाचाळ चंद्रकांत पाटलांनी ते स्वच्छपणे पत्रकारांना सांगितलं. तेही सुनेत्राताईंच्या समोरच. मग अजितदादा पिसाटणार नाहीत तर काय?पवारांनी अजितदादांवर विश्वासानं बारामती सोपविली होती. राज्याच्या पक्षाची धुराही त्यांच्याकडे दिली होती. बारामतीवर दादांची पकड असल्यानं सुप्रिया सुळेंसाठी निवडणूक सोपी नव्हती.

# विकासाकडे न पाहणारा अनाकलनीय जनादेश

महाराष्ट्रात धरसोडीच्या राजकारणाला मतदारांनी धडा शिकवला म्हणावे, तर बिहारात ते का झाले नाही? कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा, संरक्षण, अर्थव्यवस्था यांमधली प्रगती सहज पाहता येण्याजोगी आहे. तरीही विकासाऐवजी केवळ सामाजिक समीकरणेच कारणीभूत ठरली असतील, तर तो चिंतेचा विषय आहे...

लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होत आहेत, कल स्पष्ट दिसत आहे. भाजप, त्यातही विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी हे निकाल धक्कादायक आहेत. काँग्रेसप्रणीत 'इंडी आघाडी'ने हुरळून जाण्यालायक परिस्थिती आहे. उबाठा शिवसेनेने तर अगदी आनंदातिशयाने नाचायलाही हरकत नाही. नरेंद्र मोदींनी चारशे पार नारा दिला आणि त्यांना तीनशे पार करायलाही दमछाक होत आहे. भाजपच्या दृष्टीने, लोकसभेच्या १२८ जागा असलेल्या उत्तर प्रदेश व महाराष्ट्र या राज्यात मोठा उलटफेर झाला आहे आणि त्यामुळे भाजपला निर्भेळ बहुमतापासून वंचित राहावे लागत आहे. जो पराभूत होतो, त्याचे दोष स्पष्ट दिसू लागतात. प्रत्येक जण आपल्या मगदुराप्रमाणे, आकलनाप्रमाणे भाजपची ही पीछेहाट का झाली, हे अहमहमिकेने सांगत आहे. खरे म्हणजे या विषयात कुणी नाक खुपसू नये, असे माझे मत आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात एकाच विचाराने मतदान होत नाही. परंतु एक-दोन कारणांमध्ये देशातील मतदारसंघांना गुंडाळणे योग्य नाही. त्यापेक्षा जनादेश काय आहे आणि त्याचा अन्वयार्थ काय आहे, याचा अधिक विचार करावा, असे वाटते.केवळ विकास पुरेसा नाही?या निवडणुकीचा जनादेश गुंतागुंतीचा व अनाकलनीयही आहे. केवळ विकासाची कामे करून निवडणूक जिंकता येत नाही, असे मानायचे का? तसे असते तर मोदींना प्रचार करण्याची पाळीच यावी ना! त्यांच्या स्वत:च्या वाराणसी मतदारसंघात एका क्षणी ते माघारले होते. तिकडे अमित शहा पाच लाखांपेक्षा अधिक मतांनी विजयी होत आहेत. म्हणजे गांधीनगर मतदारसंघात खूप विकास झाला आणि वाराणसीत कमी झाला, असे म्हणायचे काय?प्रत्येक राजकीय पक्ष निवडणूक जिंकण्याच्या इराद्यानेच निर्णय घेत असतो. उमेदवारांची निवड, प्रचाराची दिशा, सामाजिक समीकरणे सांधण्याची धडपड इत्यादी बाबींमध्ये निर्णय घेताना आपण जिंकलो पाहिजे, हीच आंतरिक इच्छा असते. परंतु प्रत्येक निर्णय फलदायी होतोच असे नाही. देशाच्या प्रगतीसाठी जे काही घटक कारणीभूत असतात, त्या सर्व क्षेत्रांत नरेंद्र मोदी यांच्या सरकारने चांगली कामगिरी केली आहे. तरीही मतदान करताना त्याचे प्रकटीकरण का झाले नसावे? सुरक्षा, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची कीर्ती वाढणे, आर्थिक आघाडीवर समाधानकारक स्थिती असणे, उद्योग क्षेत्रातही घोडदौड, शौचालय, वीज, पिण्याचे पाणी, चांगले रस्ते या प्राथमिक गरजा पुरविण्यातही नरेंद्र मोदी सरकार कुठे कमी पडले असे दिसत नाही. महिलांना सन्मान देण्यातही ते कमी पडले नाहीत. 'सबका साथ' आणि 'सबका विकास' या तत्त्वांवर निष्ठा ठेवत या सरकारने आपले कार्य केले. विकासाच्या बाबतीत कुठलाही भेदभाव बाळगला नाही. मग तरीही मतदारांनी नरेंद्र मोदींना समाधानकारक यश का दिले नाही, हा खरा प्रश्न आहे. सामाजिक समीकरणे जुळविण्यात मोदी कमी पडले, असेही नाही. वेगवेगळ्या राज्यांमध्ये बघितले तर त्याचाही जोरदार प्रयत्न झालेला दिसतो. निवडणूक जिंकण्यासाठी जे जे आवश्यक ते ते सर्व काही केले आणि तरीही जेव्हा अपेक्षित यश मिळत नाही, तेव्हा असे का घडले याचे कारण शोधणे मोठे कठीण होते.

जनादेशाचे म्हणणे असेल की, एकाच पक्षाचे बहुमतातील सरकार आम्हाला नको. कदाचित असे सरकार तडजोडीला तयार नसते. म्हणून सत्तेत नरेंद्र मोदीच हवेत; पण पूर्ण बहुमताने नाही, असा अर्थ काढता येईल. असो. तसेअसेल, तर मोदींनी तो मान्य करून पुढील पाच वर्षे सरकार चालवावे.



फोडाफोडी, धरसोडीचे राजकारण महाराष्ट्रात काय निकाल येतील, याकडे सर्व देशाचे लक्ष लागले होते. याला कारण गेल्या काही वर्षांत या राज्यातील राजकीय परिस्थिती खूपच गुंतागुंतीची झाली होती. शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करून सत्ता मिळविली. नंतर एकनाथ शिंदेंनी बंड करून भाजपसोबत सत्ता मिळविली. तिकडे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवारांची साथ सोडून अजित पवारही सत्तेत आले. त्यामुळे कोण कोणासोबत आहे, हे नेमके जनतेलाच समजत नव्हते. या निवडणुकीच्या निकालावरून जनतेने भाजप- शिंदे- अजित पवार यांच्या युतीला नापसंती दर्शविली आहे. असे फोडाफोडीचे, धरसोडीचे राजकारण मान्य नसल्याचा जनादेश दिला आहे.

परंतु तिकडे बिहारमध्ये मात्र असेच राजकारण करणाऱ्या नितीशकुमारांना डोक्यावर घेतले आहे. काहींच्या मते भाजपची ही युती अभद्र होती. लोकांनी म्हणून निवडून दिले नाही. असे असेल तर मग उत्तर प्रदेशात कुठली अभद्र युती होती? तिथे समाजवादी पक्षापेक्षाही कमी जागा का दिल्यात भाजपला? माझ्या मते महाराष्ट्रात सामाजिक समीकरण न साधल्याने भाजप आघाडीला हे कमी यश मिळाले असावे. या राज्यात सामाजिक समीकरणाच्या बाबतीत शरद पवारांचा हात कुणीच धरू शकत नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या चातुर्याने भाजप आघाडीला सामाजिक समीकरणाचे गणित सोडवूच दिले नाही, असे म्हणता येईल. पण तसे पाहिले तर त्यातही त्यांना खूप यश आले असे म्हणता येणार नाही. विविध मतदारसंघांतील निकाल पाहिले तर कुठले एकच कारण सर्वांना लागू करता येण्यासारखी स्थिती नाही.मराठा आंदोलन मराठा आंदोलन आणि मराठा मते यांचा फटका शिंदेंच्या उमेदवारांना बसला असे म्हणता येईल. ज्या पद्धतीने हे आंदोलन उभे करण्यात आले आणि नंतर चालविण्यात आले, त्यावरून भाजप व शिंदे- अजित पवार यांना जेरीस आणणे, हेच त्याचे ध्येय होते, असे वाटते. त्याचा फार मोठा फटका भाजप आणि शिंदे यांना बसला. मराठवाड्यात या आंदोलनाचा जोर होता आणि तिथे शिंदे व भाजपचे उमेदवार पराभूत होताना दिसत आहेत. ज्यांना निवडून दिले, ते मराठा आरक्षण देतील की नाही, याची शंकाच आहे. परंतु फडणवीस यांना हरविणे हेच जे या आंदोलनाचे ध्येय आडून दिसत होते, ते पूर्ण झाल्याचे चित्र आज तरी दिसते. दुसरा एक चिंतेचा विषय म्हणजे, विकासाचे राजकारण निवडून येण्यास पुरेसे नाही, असे वाटू लागत आहे. तसे नसते तर नागपुरातून नितीन गडकरी यांना इतक्या कमी मताधिक्याने विजय मिळाला नसता. गडकरींच्या बाबतीत, त्यांनी केलेल्या धडाडीच्या कामांबाबत कुणाच्याही मनात शंका किंवा किंतु नाही. असे असतानाही त्यांना इतके कमी मताधिक्य का मिळावे? नागपुरात त्यांनी जी कामे केली आहेत, त्याची फळे यच्चयावत नागरिक उपभोगतात. मग मतदान करताना वेगळा विचार का व्हावा? जातीपातीचे, भेदभावाचे राजकारण बाजूला सारून लोकहिताची कामे, विकासाची कामे यातच सदैव रमणाऱ्या गडकरींसारख्या व्यक्तीलाही जनादेशाने एक वेगळाच संदेश दिला आहे, असे म्हणावे का? एकूणच काय? जनतेने तर आदेश देऊन आपले काम केले आहे. त्याचा अर्थ आणि अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न प्रत्येक जण आपापल्या परीने करणार. माझ्या परीने मी तो केला आहे. आजही देशात विकासाला बाजूला ठेवून, सामाजिक समीकरणावरच निवडणुका जिंकल्या जात असतील तर राजकारण्यांना, विकासाच्या राजकारणाचा विचार करू नये असे वाटू लागले तर तो एक चिंतेचा विषय राहील. या जनादेशाने ही चिंता वाढली आहे, हे नक्की.

# संविधान बदलाच्या चर्चेचा भाजपला फटका

'चारसो पारचा' नारा संविधान बदलासाठीच आहे, अशी लोकांची धारणा पक्की झाली. ती बदलण्याचे भाजपचे सारे प्रयत्न फोल ठरल्याचेच निकालांवरून दिसते भारतात जी लोकशाही पाऊणशे वर्षे टिकून आहे, त्याचे कारण म्हणजे भारतीय संविधान. निवडणुकीच्या माध्यमातून सत्ताबदल होतो, हे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण मानले जाते, परंतु भारताला जे सार्वभौम गणराज्य म्हटले जाते, त्याचाही आधार संविधानच आहे. या आधीच्या निवडणुकांमध्ये लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संविधानाची कधी चर्चा झाली नव्हती, परंतु या वेळी ती झाली आणि चर्चेचे परिणामही दिसले, हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील अभूतपूर्व यशानंतर भाजपचा वारू चौखुर उधळला. प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या भाजप सरकारने देशाच्या सर्वसमावेशक विकासाची भूमिका घेण्याऐवजी राजकारणाच्या चिंधड्या उडविण्यास, विरोधी पक्षांना नेस्तनाबूत करण्यास सुरुवात केली. घटनात्मक संस्था, व्यवस्था खिळखिळ्या केल्या. देशाला एक संविधान आहे आणि त्या संविधानानुसार राज्यकारभार करायचा असतो, याचा पाशवी बहुमत मिळविलेल्या भाजपला विसर पडला. त्याचे पडसाद हळूहळू संविधानाने संरक्षण दिलेल्या समाजात उमटत होते. ते अदृश्य स्वरूपात होते. परंतु भाजपने चारशे पारचा नारा दिला आणि त्या पक्षाचे जबाबदार मंत्री, खासदार संविधान बदलाची भाषा बोलू लागले, त्यामुळे संविधान व लोकशाहीवर निष्ठा असणारा वर्ग अस्वस्थ झाला. संविधानाने या देशातील अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आर्थिक मागास, अल्पसंख्याक वर्गाला संरक्षण दिले आहे. उद्या संविधानच राहिले नाही, तर ८५ ते ९० टक्के लोकसंख्या असलेल्या या वर्गाला त्यांच्या अस्तित्वाची भीती वाटणे स्वाभाविक आहे. त्याचे पडसादही प्रचारात आणि निकालात उमटले.



यापूर्वी ज्या लोकसभेच्या निवडणुका झाल्या, त्या वेळी भाजपसह सर्वच राजकीय पक्ष आम्ही बहुमत मिळवू व सत्तेवर येऊ असे दावे करीत होते. त्यात अप्रस्तुत असे काहीच नाही. मात्र या वेळी पहिल्यांदा भाजपने ४०० हून अधिक जागा जिंकणार असा दावा केला. चारसो पार कशासाठी तर संविधान बदलण्यासाठी अशी महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांचा प्रभाव असणाऱ्या समाजाची भावना झाली. त्यामुळे आंबेडकरवादी, डाव्या, पुरोगामी विचारांच्या बिगर राजकीय संघटना सक्रिय झाल्या. त्यांच्या त्यांच्या परीने संविधान बदलाच्या विरोधात भूमिका घेत राहिल्या व लोकांमध्ये तसा प्रचार सुरू केला. त्यामुळे निवडणुका जाहीर होण्याआधीपासूनच महाराष्ट्रात भाजपच्या विरोधात कशी राजकीय आघाडी उभी राहते, यावर आंबेडकरी समाजाचे लक्ष होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व शिवसेना उद्धव ठाकरे गट यांची महाविकास आघाडी आधीपासून होतीच. त्यात वंचित बहुजन आघाडी सामील होते का, याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. परंतु शेवटच्या क्षणी वंचित आघाडीने स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महाराष्ट्रात २०१९ च्या निवडणूक निकालाची पुनरावृत्ती होईल, असे काहींचे आडाखे होते. परंतु महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचे जे निकाल व कल समोर आले आहेत, त्याचा विचार करता संविधान बदलाची चर्चा हा घटक महाविकास आघाडीच्या यशामध्ये प्रभावी ठरल्याचे दिसते आहे. अर्थात संपूर्ण निकाल व आकडेवारी जाहीर झाल्यानंतर, वंचित आघाडीचा या निवडणुकीत किती प्रभाव पडला, त्याचे विश्लेषण करता येईल.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ३० जागांवर विजय मिळाला आहे. २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत भुईसपाट झालेला काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वांत मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. त्याबरोबरच शिवेसना ठाकरे गट व राष्ट्रवादी शरद पवार गटला मिळालेले यश मोठेच आहे. काँग्रेसला मिळालेल्या घवघवीत यशामध्ये संविधनाचा मुद्दा आणि त्याला धरून अनुसूचित जाती, जमाती व अल्पसंख्याकाची मिळेली साथ महत्त्वूर्ण ठरली आहे, असे म्हणता येईल.

या निवडणुकीत संविधान बदलाची चर्चा सुरू झाली, तो सूर पकडून काँग्रेसने त्याचा निवडणूक प्रचारात कौशल्याने वापर केला. काँग्रेस नेते राहुल गांधी प्रचारसभेत भाषण करताना संविधानाची प्रत दाखवत ही लढाई सत्तेसाठी नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान वाचविण्यासाठी आहे, अशी साद लोकांना घालत. दुसऱ्या बाजूला काँग्रेसने न्याय पत्र नावाने जो जाहीरनामा मतदारांसमोर ठेवला, त्यातील अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, अल्पसंख्याक, आर्थिक दुर्बल वर्गाच्या देशाच्या सत्तासंपत्तीमधील सहभागाचा मुद्दा होता, त्याचाही मोठा प्रभाव या वर्गावर पडलेला दिसतो.

महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा कायदा करूनही महायुतीला त्याचा लाभ मिळाला नाही. विधिमंडळात मराठा आरक्षणाचा कायदा मंजूर होतो, परंतु तो न्यायालयात जाऊन अडकतो हा या पूर्वीपासूनचा अनुभव आहे. हा घटनात्मक पेच सोडवायचा असेल, तर संविधानातील आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा वाढविणे, हा रास्त मार्ग आहे. काँग्रेसचे न्याय पत्र त्या अर्थानेही आश्वासक आहे, त्याचा फायदा काँग्रेसला झाल्याचे दिसते आहे. भाजपने काँग्रेसच्या न्याय पत्राची खिल्ली उडविली परंतु, त्यांना प्रभावी प्रतिवाद करता आला नाही. काँग्रेसने मात्र भाजपच्या टीकेला उत्तर देण्यात वेळ न घालवता, न्याय पत्रातील आश्वासनांची प्रभावी मांडणी केली. त्यामुळे महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशात काँग्रेसला फायदा झाला व भाजपचे नुकसान झाले.

भाजपच्या धर्माधिष्ठित राजकारणाला प्रतिरोध करणारी आंबेडकरी विचारांची राजकीय व सामाजिक चळवळ या दोन राज्यांमध्ये प्रभावी आहे. आंबेडकरी विचारधारा स्वीकारलेल्या समाजाने संविधान संरक्षणासाठी भाजपच्या विरोधात आणि इंडिया आघाडीच्या बाजूने भूमिका घेतली. उत्तर प्रदेशात प्रमुख सत्ताधारी असलेला आणि मागील लोकसभा निवडणुकीत १० जागांवर विजय मिळवलेल्या बसपलाही फारसा प्रभाव दाखविता आला नाही. मतविभाजनाचा फायदा भाजपला मिळू नये, यासाठी दोन्ही राज्यांमधील आंबेडकरी विचारांचा प्रभाव असलेल्या मतदारांनी इंडिया आघाडीच्या बाजूने उभे राहण्याचा जाणीवपूर्व प्रयत्न केल्याचे निकालातून स्पष्ट होत आहे.

महाराष्ट्रात मागील लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडीचा प्रभाव किंवा परिणाम म्हणून काँग्रेसला जवळपास ११ मतदारसंघांत पराभूत व्हावे लागले होते. चंद्रपूरची जागा कशी बशी मिळाली होती. या वेळी काँग्रेसला एकूण १३ जागा मिळाल्या आहेत. संविधान बदलाचा मुद्दा हा केवळ अनुसूचित जातीच नव्हे तर अनुसूचित जमातीमध्येही प्रभावी ठरल्याचे दिसत आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जातीसाठी अमरावती, रामटेक, शिर्डी, सोलापूर व लातूर हे पाच लोकसभा मतदारसंघ राखीव आहेत. या पाचही मतदारसंघांत महाविकास आघाडीला विजय मिळाला आहे. अमरावती, रामटेक, लातूर व सोलापूरमध्ये काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले, तर शिर्डीची जागा शिवसेना ठाकरे गटाने जिंकली आहे. एकेकाळी आदिवासी समाजही काँग्रेसचा जनाधार होता. परंतु भाजपने जाणीवपूर्वक या समाजाला आपल्याकडे वळविण्यात यश मिळविले. त्यामुळे आदिवासीबहुल मतदारसंघांमध्ये भाजपने विजयाची मक्तेदारीच प्रस्थापित केली होती. त्यालाही या वेळी काँग्रेसने हादरा दिला. राज्यात नंदुरबार, गडचिरोली, दिंडोरी व पालघर हे चार मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. त्यांतील पालघर फक्त भाजपकडे गेला, उर्वरित तीनही मतदारसंघांवर महाविकास आघाडीने कब्जा मिळविला आहे. इतकेच नव्हे तर आदिवासीबहुल चंद्रपूर व धुळे जिल्ह्यातही काँग्रेसने बाजी मारली आहे.

मुंबई हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला मानला जातो. त्याची प्रचीती निवडणूक निकालाने आली. मुंबईतील सहापैकी चार जागा महाविकास आघाडीला मिळाल्या आहेत. वायव्य मुंबई मतदारसंघाचा निकाल रात्री उशिरापर्यंत हाती आला नव्हता. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यांत भाजपने संविधान बदलणार हा काँग्रेसचा खोटा प्रचार आहे, असा सूर लावला तरी, चारसो पारचा नारा हा संविधान बदलण्यासाठी होता, अशी पक्की धारणा आंबेडकरी विचारधारा स्वीकारलेल्या समाजाची झाली होती. मतदानातून ती व्यक्त झाली. महाराष्ट्रातील फोडाफोडीच्या राजकारणाचा भाजपवर परिणाम झालाच, परंतु त्याबरोबरच संविधान बदलाच्या चर्चेचा भाजपला फटका बसला आहे, असे म्हणता येईल. पक्षनिहाय संपूर्ण मतदानाची आकडेवारी जाहीर झाल्यानंतर, त्यावर अधिक प्रकाश टाकता येईल.

# शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना सरकारने करावी.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ ला झाला. त्या निमित्ताने दरवर्षी ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार,भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी,गरीबी यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे.त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवांसाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.त्यामुळे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दु:खात सहभागी व्हायला पाहिजे.शुक्रवार १९ फेब्रुवारी १६३० साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला.त्यामुळे दरवर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते.त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात.महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते. ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे राज्याभिषेक सोहळाघराघरात साजरा व्हायला पाहिजे. शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंतःकरणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे.आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे.यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल. शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही. परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या,भुकेलेल्यांना अन्न, रोजगार याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील. कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो व पहातो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे.शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.१९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते.कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्र्वास,तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड किल्ले आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वत: बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे.यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर आहे.कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते. गडकिल्ल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल.कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे.कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती.आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले.अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले.हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा.यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे.यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे.६ जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून,वाढते प्रदूषण व बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील.शिवरायांना माझा मानाचा मुजरा. =ʃ जय शिवाजी=ʃ.

**********

हर हर महादेव.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# लहान मुलाला बद्धकोष्टतेची समस्या असेल तर हा घरगुती उपाय करा



जन्मानंतर, एक वर्षापर्यंत मुलाच्या शरीरात अनेक बदल होतात. या कालावधीत, ६ महिन्यांनंतर मुलाच्या आहारात सतत बदल होतो. काही समस्या मुलांमध्ये खूप सामान्य असतात, जसे की बद्धकोष्ठता.

वास्तविक, दूध किंवा अन्न पचण्यास असमर्थतेमुळे मुलाला बद्धकोष्ठतेचा त्रास होतो. त्याच वेळी, दिनचर्या बदलणे किंवा फायबर युक्त गोष्टी न खाणे यामुळे देखील मुलामध्ये बद्धकोष्ठता होऊ शकते. अशा परिस्थितीत, बडीशेप आणि ओव्याचा उपाय मुलांना बद्धकोष्ठतेपासून आराम देण्यासाठी खूप प्रभावी आहे.

मुलांना बद्धकोष्ठतेपासून आराम देण्यासाठी बडीशेप आणि ओवाची कृती - परंतु ही रेसिपी फक्त ६ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनाच दिली जाऊ शकते. या रेसिपीसाठी,बडीशेप आणिओवाचा एक काढा बनवावा लागेल, ज्याचे घटक खालीलप्रमाणे आहेत:

साहित्य पाणी - एक कप बडीशेप - १ टीस्पून ओवा - ञ टीस्पून कृती एका पातेल्यात पाणी उकळत ठेवा. आता त्यात १ चमचे बडीशेप आणि ञ टीस्पून ओवा घाला.

२ मिनिटे शिजू द्या. पाणी गाळून थंड होऊ द्या. थोडं थंड झाल्यावर चमच्याच्या साहाय्याने बाळाला प्यायला द्या.संपूर्ण दिवस मुलासाठी एक कप डेकोक्शन पुरेसे असेल. हा उपाय तुम्ही तुमच्या मुलाला दिवसातून २ ते ३ वेळा देऊ शकता.हे लक्षात ठेवा की जेव्हा तुम्ही हा काढा मुलाला चमच्याने पाजता तेव्हा मुलाच्या तोंडातून जे बाहेर पडते ते पुन्हा वाडग्यात मिसळू नका. यामुळे संसर्गाचा धोका वाढू शकतो.ओवा निरोगी पचन करण्यास मदत करते, ज्यामुळे ते मुलांसाठी देखील फायदेशीर ठरते. बडीशेप अन्न पचण्यास आणि पोट थंड ठेवण्यास मदत करते. हे मुलाच्या संपूर्ण शरीरासाठी फायदेशीर आहे. या गोष्टींची काळजी घ्या- खबरदारी घेतली पाहिजे

लक्षात ठेवा की मुलाने दिवसभरात पुरेसे पाणी प्यावे.

मुलाच्या आहारात फायबरयुक्त पदार्थ अवश्य समाविष्ट करा, जेणेकरून मुलाची पचनक्रिया सुरळीत राहते.

जर बाळ सहा महिन्यांचे असेल तर त्याला हळूहळू ठोस पदार्थ देणे सुरू करा. कारण अचानक सर्वकाही दिल्याने त्याच्या पचनाला हानी पोहोचते.


# भूक लागली आहे का? बनवा चविष्ट झटपट ब्रेड पुलाव, जाणून घ्या रेसिपी

सध्या उन्हाळा सुरु आहे. मुलांना देखील सुट्टी लागली आहे. संध्याकाळी प्रत्येकाला छोटी छोटी भूक लागते. अश्यावेळेस काय करावे सुचत नाही. म्हणून आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत झटपट बनेल असा ब्रेड पुलाव, तर चला लिहून घ्या रेसिपी




साहित्य- २ चमचे तेल १ चमचा मोहरी १ चमचा हिरवी मिर्चीचे तुकडे ६० ग्रॅम कांदा १/२ चमचा मीठ १/४ चमचा हळद १/४ चमचा तिखट १/४ धणे पूड १/४ गरम मसाला ६० ग्रॅम टोमॅटो ६० ग्रॅम शिमला मिर्ची १२० ग्रॅम ब्रेड स्लाइस १ चमचा केचअप भाजलेले शेंगदाणे कृती- ब्रेड पुलाव बनवण्यासाठी एका पॅनमध्ये तेल गरम करावे तसेच त्यामध्ये मोहरी घालावी. मग हिर्वी मिरची, कांदा, मीठ, हळद, तिखट, धने पूड, गरम मसाला टाकून दोन मिनिट शिजवावे. मग मध्ये टोमॅटो, शिंमला मिर्ची घालावी. मग परत दोन मिनिट शिजल्यानंतर त्यामध्ये बारीक केलेल्या ब्रेडच्या स्लाइस घालाव्या. व त्यावर केचप टाकावे. दोन मिनिट शिजवल्यावर यावर भाजलेले शेंगदाणे घालावे. तर चला तयार आहे आपला गरमागरम, झटपट ब्रेड पुलाव.

# जागतिक पर्यावरण दिन २०२४ : पर्यावरण दिनावर निबंध




पर्यावरण हा शब्द परि आणि आवरण या दोन शब्दांनी बनलेला आहे ज्यामध्ये परि म्हणजे आपल्या अवतीभवती किंवा आपल्या सभोवताली.आवरण म्हणजे आपल्या सभोवताल जे व्यापले आहे.

पर्यावरणहे वातावरण,हवामान,स्वच्छता,प्रदूषण आणि झाडांपासून बनलेले आहे.सर्व गोष्टी म्हणजेच पर्यावरणाचा आपल्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंध आहे आणि आपल्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. मनुष्य आणि पर्यावरण एकमेकांवर अवलंबून आहे. प्रदूषण किंवा झाडांची कमतरता या पर्यावरणीय प्रदूषणाचा थेट परिणाम मानवी शरीरावर आणि आरोग्यावर होतो.मानवाच्या चांगल्या सवयी जसे की झाडांची जोपासना करणे. प्रदूषण रोखणे,स्वच्छता राखणे या साऱ्या गोष्टी पर्यावरणाला प्रभावित करतात.मानवाच्या वाईट सवयी जसे की पाणी घाण करणे,पाण्याचे अपव्यय करणे,झाडे कापणे,या गोष्टी पर्यावरणाला प्रभावित करतात.याचा परिणाम म्हणजे नैसर्गिक आपत्तींना सामोरी जावे लागते.

संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेला हा दिवस जागतिक पातळीवर पर्यावरणा विषयी जागरूकता आणण्यासाठी साजरा केला जातो. याची सुरुवात १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून ते १६ जून या कालावधीत आयोजित जागतिक पर्यावरण परिषदेत केली. पहिला जागतिक पर्यावरण दिन ५ जून १९७३ रोजी साजरा करण्यात आला.पर्यावरणाच्या जैविक घटकांमध्ये सूक्ष्मजीवांपासून कीटक, प्राणी आणि वनस्पती आणि सर्व जैविक क्रियाकलाप आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रियांचा समावेश आहे. वातावरणाच्या अजैविक घटकांमध्ये निर्जीव घटक आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रिया असतात, जसे की पर्वत, खडके,नदी,वारं आणि हवामान घटक.सर्वसाधारणपणे,हे सर्व जैविक आणि अजैविक घटक, तथ्य, प्रक्रिया आपल्या जीवनावर परिणाम पाडणाऱ्या घटनांचा समावेश असलेले एक घटक आहे. हे आपल्या सभोवताली व्यापलेले आहे. आपल्या जीवनातील प्रत्येक प्रसंग या पर्यावरणावर अवलंबून आहे आणि तसेच ते संपादित केले जाते. मानवांनी केलेल्या सर्व कृतींचा पर्यावरणावर थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम होतो. अशा प्रकारे, जीव आणि पर्यावरणामध्ये देखील एक संबंध आहे,जो परस्पर अवलंबून आहे. मानवी हस्तक्षेपाच्या आधारे, पर्यावरणाची दोन भागात विभागणी केली जाऊ शकते, पहिली नैसर्गिक किंवा नैसर्गिक वातावरण आणि मानवनिर्मित वातावरण. ही विभागणी नैसर्गिक प्रक्रिया आणि परिस्थितीत मानवी हस्तक्षेपाच्या अत्यधिक प्रमाणात आणि कमतरतेनुसार आहे. प्रदूषण, हवामान बदल इत्यादी पर्यावरणीय समस्या मानवाला त्यांच्या जीवनशैलीबद्दल पुनर्विचार करण्यास प्रवृत्त करत आहे आणि आता पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरण व्यवस्थापन करणेआवश्यक आहे.आज आपल्याला सर्वात जास्त गरज आहे ती म्हणजे सर्वसामान्यांना आणि सुशिक्षित वाचकांना पर्यावरणाच्या संकटाची जाणीव करुन देण्याची आणि पर्यावरणाच्या रक्षणाची प्रतिज्ञा घेण्याची.आपण आपल्या पर्यावरणाचा सांभाळ करू.अशी प्रतिज्ञा घेऊ या.आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करू या.

# वजन कमी करण्यासाठी दररोज १० हजार पावले चालता? आताच थांबवा; जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात?

तुम्ही दररोज किती पावले चालता? वजन कमी करण्यासाठी तुम्ही दररोज १० हजार पावले चालता का? मग थांबा! कारण- तज्ज्ञांच्या मते, वजन कमी करण्यासाठी ही कृती करणे चुकीचे आहे. कारण- हा काही जादूचा प्रयोग नाही. त्यामुळे ज्या लोकांचे वजन जास्त आहे आणि जे गुडघेदुखीने त्रस्त आहेत त्यांनी १० हजार पावले चालणे चुकीचे आहे.



आतड्यांचे आरोग्य तज्ज्ञ डॉ. संध्या लक्ष्मी सांगतात, जेव्हा लठ्ठ लोक दररोज १० हजार पावले चालण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांच्यावर खूप ताण येतो आणि त्यांना सांधेदुखी, स्नायूंचा त्रास होऊ शकतो. कारण- त्यांचे स्नायू १० हजार पावले चालणे सहन करू शकत नाहीत. त्या सांगतात, ज्या लोकांना गुडघ्याशी संबंधित समस्या आहेत त्यांनी प्रशिक्षणाशिवाय १० हजार पावले चालू नयेत.

मुंबईच्या परळ येथील ग्लेनिगल्स हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक्स वरिष्ठ सल्लागार डॉ. अनूप खत्री सांगतात, वरील सल्ला हा मंद गतीची चयापचय क्रिया, आनुवंशिकता व चुकीची जीवनशैली यांमुळे लठ्ठपणा असलेल्या लोकांसाठीसुद्धा आहे. ते पुढे सांगतात, चालणे हा वजन कमी करणे किंवा तीव्र स्वरूपाचा व्यायाम नसून, शरीराला लवचिक बनविण्याचा तो एक प्रभावी मार्ग आहे.

पुणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक व रोबोटिक सर्जन डॉ. निर्मल डुमणे सांगतात, योग्य प्रशिक्षणाशिवाय १० हजार पावले चालण्याने तुमची अस्वस्थता वाढू शकते. त्याशिवाय तुम्हाला दुखापत होऊ शकते किंवा दीर्घकालीन स्नायू वा सांध्यांची समस्याही उदभवू शकते.

ते पुढे सांगतात, शरीराला आधार देणारे स्नायू जेव्हा कमकुवत होतात तेव्हा कोणतीही शारीरिक हालचाल करताना व्यक्तीला आणखी दुखापत होऊ शकते. लठ्ठपणा ही समस्या का आहे?डॉ. अनूप खत्री सांगतात, लठ्ठपणामुळे स्नायू कमकुवत होतात आणि मग त्यावर थोडा जरी जास्त तणाव आला तरी अस्वस्थता जाणवते आणि शरीरावर ताण येऊ शकतो. दररोज १० हजार पावले चालण्यापूर्वी आपले शरीर निरोगी आणि तंदुरुस्त ठेवणे आवश्यक आहे. डॉ. संध्या लक्ष्मी यांच्या सल्ल्यानुसार, खालील व्यायामांमुळे वजन कमी करण्यास मदत होऊ शकते. जाणून घेऊ या, ते व्यायाम कोणते?

सर्व सांधे आणि स्नायूंची हालचाल करा. त्यांना वाकवा, फिरवा आणि ताणा.

खुर्चीवर बसा आणि पाच मिनिटे पायांची हालचाल करा.

खुर्चीवर बसा आणि एका वेळी एकच गुडघा वर न्या. त्यानंतर दुसरा गुडघा वर न्या. असे ५-१० वेळा करा.

हळूहळू खुर्चीवर बसा आणि हळूहळू उभे राहा. त्यानंतर छाती वर उचलून खुर्चीवर बसा. अशा प्रकारे खुर्चीवर स्क्वॅट्स करा.

उभे राहून पायांची बोटे वर करा आणि हळूहळू खाली आणा. असे पाच ते १० वेळा करा.

वरील व्यायाम नियमित केल्यास फायदा होऊ शकतो. डॉ. खत्री सांगतात, सांधेदुखीचा त्रास असेल, तर कोमट तेलाने स्नायूंना मसाज करा.

# लामजना निवासी शाळा येथे प्रवेश प्रक्रिया सुरु....

लातूर:- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची निवासी शाळा अनु.जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा लामजना ता. औसा जि.लातूर येथे इयत्ता ६ वी ते इयत्ता १० वी सेमी इंग्रजी माध्यमाची जून २०२३ पासून सुरु झाली असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. अनुसिचीत जाती व नवबौद्धांच्या मुला/मुलींकरिता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक आशा ३५३ शासकीय निवासी शाळा सुरु करणे बाबत दि. १ जून २००६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्णय घेतलेला आहे. राज्यात आजतागायत ९० पेक्षा जास्त निवासी शाळा सुरु असून या योजने अंतर्गत लातूर जिल्ह्यात ५ निवासी शाळा सुरु आहेत . लामजना येथे सामाजिक न्याय विभागाने सेमी इंग्रजी माध्यमाची भव्य व दिव्य सर्व सोयीयुक्त आपल्या शैक्षणिक योजनांचा विस्तार करत जिल्हावासियांसाठी ६ वी शाळा औसा तालुक्यातील लामजना येथे दि. १५ जून २०२३ पासून सुरु झालेली आहे. तरी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ प्रवेश प्रक्रिया करण्याकरिता सामाजिक न्याय विभागाचे कर्मचारी गावोगावी सर्वे, पालक भेटी, विद्यार्थी शोध मोहीम इ. राबवत आहेत. या शाळेत इयता ६ वी ते इ १० वी सेमी इंग्रजी माध्यमाच्या प्रत्येकी वर्गासाठी फक्त मुलाकरिता ४० जागेसाठी प्रवेश प्रक्रिया पार पाडत आहे. या करिता सामाजिक आरक्षणही पुढील प्रमाणे ठेवण्यात आलेले आहे. अनुसूचित जाती ८०% अनुसूचित जमाती १०% विमुक्त जाती व जमाती ५% दिव्यांग प्रवर्ग ३% व विशेष मागास प्रवर्ग २%.

राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अनु. जाती व नवबौद्ध मुला/मुलींची शासकीय निवासी शाळेंचा इयत्ता १० वी वर्गाचा १००% निकालाची परंपरा आहे. सर्व शाळा आय.एस. ओ. मानांकन प्राप्त असून सन २०१६-१७ च्या मानवसंसाधन विकास मंत्रालय नवी दिल्ली यांचा स्वच्छ विद्यालय पुरस्कार तसेच जलसंवर्धन नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय नवी दिल्ली यांचा सन २०१७-२०१८ चा राष्ट्रीय जल पारितोषक पुरस्कार विभागातील अनेक शाळेने पटकावलेला आहे. या शाळेत महाराष्ट्र शासन व कला संचालनालय मुंबई मार्फत घेण्यात येणाऱ्या इलेमेंटरी व इंटरमीजीट परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा इ.ची तयारी करून घेण्यात येते. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांना १ वेळा नाश्ता २ वेळा पोटभर रुचकर जेवण, अंघोळीसाठी गरम पाणी, पिण्यासाठी आर.ओ.चे पाणी, २ गणवेश व आवश्यक शैक्षणिक व इतर साहित्य विनामुल्य देण्यात येते. गत काही वर्षात शाळेने महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अल्पविधीत आपले नाव मिळविले आहे. १००० पेक्षा जास्त संदर्भ पुस्तकांचे ग्रंथालय, ई-लायब्ररी, अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल वर्ग खोल्या, प्रोजेक्टरचा आद्यापनात प्रभावी वापर, संगणककक्ष, २४ तास सुरक्षा रक्षक, अनुभवी व तज्ञ शिक्षक येथे उपलब्ध आहेत. लामजना येथील शाळेत राज्य स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार व सामाजिक न्याय विभागाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यांची नेमणूक केलेली आहे.तरी इच्छुकांनी या शाळेत प्रवेशासाठी दिनांक १४ जून २०२४ पर्यंत शाळेचे मुख्याध्यापक - श्री. डी. एस. मुखम - ९४०४२ ७२७७४ सहाय्यक शिक्षक/ शिक्षिका- श्री ए.वाय. हौसलमल- ८६६८३०६५४७, श्रीमती एस. एस सुर्यवंशी ९७६७६३५०८२ , श्रीमती एस.एस.पांचाळ : ७७५८० ९६३७७ श्री.एस.व्ही.कांबळे ८६६८७६४५९० व श्री डी. यांचे कडे नोंदणी करून घ्यावे तसेच दि. १५ जून २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता निवासी शाळा लामजना येथे प्रत्येक्ष प्रवेशासाठी विद्यार्थ्यांसह पालकांनी उपस्थित रहावे असे आव्हान शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

## हिरवी भाजीपाल्याने लागली आग वाढत्या उन्हाळ्यात, भाजीपाल्याच्या दरवाढीचे चटके

किनवट /शेख शौकत :- वाढत्या तापमानाच्या पाऱ्या सोबतच भाजीपाल्याचे भाव वधारले आहेत. सर्वच भाज्यांचे दर शंभर रुपयांच्यावर गेल्यामुळे सर्वसामान्यांना आता भाजी पासून वंचित राहण्याची पाळी आली आहे. तापमानाच्या चटक्यासोबत भाजीपाल्याच्या दरवाढीची चटके आता सर्वसामान्य माणसाला बसू लागले आहेत. किनवट शहरातील आठवडी बाजारच्या दिवशी ग्रामीण भागातील भाजी विक्रेते किनवट शहरात भाजी विक्रीसाठी येतात. भाजीपाला मार्केटमध्ये सर्व भाज्या ३० ते ४० रुपये पाव मिळत आहेत. भाजीपाला १२०,१३० रुपये प्रति किलो दराने विक्री होत आहे. यामुळे आता भाजीपाला खरेदी करण्यासाठी सर्वसामान्य माणसांची हिम्मत होत नाही. एवढी महाग भाजी सर्वसामान्यांना परवडणारी नाही. टमाटयाने शंभरी पार केली आहे. कोबीचे दर १५० रुपये किलोपर्यंत गेले आहेत. भेंडी १२० ते १३० रुपये किलो प्रमाणे विकली जात आहे. हिरव्या मिरचीचे दर १२० रुपये किलो, शेवग्याच्या शेंगा २५ ते ३० रुपये, पालकची जुडी ३० रुपये, मेथीची जुडी ३० ते ३५ रुपये, कोथींबीर ३० रुपये प्रति ५० ग्रॅम असे दर आहे. हे दर ऐकताच सर्वसामान्य माणूस हबकून जात आहे. तो एवढा महाग भाजीपाला खरेदी करू शकत नाही. यामुळे गरिबाच्या भाकरीवरची भाजी लोप पावत आहे. वाढत्या तापमानासोबतच वाढलेले भाजीपाल्यांच्या दराचे चटके आता सर्वसामान्यांना बसू लागले आहेत.



## ९ वर्षीय मुलगा हरवला आहे.



मुंबई/ शहामत शेख :- वडारपाडा रोड नो०१ समता नगर पोलिस स्टेशन कांदिवली पूर्व या हद्दीतून आर्यन अनिलकुमार चौहान ०९ वर्षाचा दिनांक ३१,मे २०२४ रोजी दुपारी साडेतीन वाजल्यापासून हरवला आहे. हा मुलगा सडपातळ,डोळे मोठे व घारे,गोरा रंग, वाढलेले काळे केस,त्याची उंची ०३फूट,२ इंच त्याने चॉकलेटी कलरचा बनियान व लाल रंगाची छोटी पँट घातली असून,तो हिंदी भाषा बोलतो. तसेच समता नगर पोलीस ठाणे अंतर्गत अज्ञात इसमा विरुद्ध गुन्हा नोंद आहे.हा मुलगा आढळल्यास मो. -९८२१७३०५१४ या क्रमांकावर संपर्क साधावा,किंवा समता नगर पोलीस ठाणे कांदिवली पूर्व येथे कळवावे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे नीट परिक्षा २०२४मध्ये घवघवीत यश

लातूर दि. ५ मे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने नीट २०२४ परीक्षेमध्ये याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत महाविद्यालयातील सोळंके तन्वी हंसराज हिने ७२० पैकी ६७० गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकावला तसेच शेख सोहेल अब्दुल गणी यांनी ५७८ गुण घेऊन महाविद्यालयातून दुसरा क्रमांक पटकावला तसेच माळी सुशांत हनुमंत यांनी ५७५ गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला तसेच नोकजा विजय अनिल कुमार ५०३ गुण, जोशी दिशा दिनेश ४५३ गुण, शेख सुजान बशीर ४१८ गुण व जोद्राने श्रद्धा सिद्धेश्वर ४०५ गुण घेऊन अनुक्रमे चौथा, पाचवा, सहावा व सातवा मान येण्याचा महाविद्यालयामध्ये पटकावला. तसेच महाविद्यालयातील डॉ. रत्नाकर बेडगे यांची कन्या रेणुका रत्नाकर बेडगे हिने ६२५ गुण, डॉ. भास्कर नल्ला रेड्डी यांची कन्या मेधा भास्कर रेड्डी हिने ४४० गुण प्राप्त केले. या सर्व गुणवंत व गुणवान विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि पेढे देवून सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक प्रा. व्ही.सी.पाटील, प्रा.एस.एम. पाटील, प्रा.डॉ.गुणवंत बिरादार, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. एम. डी. बोळेगावे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे उपस्थित होते.



महाविद्यालयाने घेतलेल्या दर रविवारच्या सराव परीक्षेमुळे उज्वल यश मिळण्यासाठी मदत झाली. सर्व प्राध्यापकानी वेळोवेळी शंकांचे समाधान केले असे मत गुणवंत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. तसेच पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोर्ड समन्वयक प्रा.व्ही.सी.पाटील यांनी केले तर आभार प्रा.के. आर सूर्यवंशी यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. अश्विनी रोडे, गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशस्वीतेसाठी नंदू काजापुरे, राजाभाऊ बोडके, अशोक शिंदे, आनंद खोपे, ज्योतीराम वलांडे आणि राम पाटील यांनी परिश्रम घेतले.

## लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. शिवाजी काळगे६१ हजार ८८१ मताधिक्याने विजयी

लातूर : - लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ४१- लातूर (अ.जा.) लोकसभा मतदारसंघातून इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी घोषित करण्यात आले. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्यांना प्रमाणपत्र प्रदान केले. लातूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून रोजी लातूर शहरातील बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे पार पडली. मतदान यंत्रावरील मत मोजणीच्या २८ फेऱ्या आणि टपाली मतमोजणीची एक फेरी झाली. यामध्ये डॉ. काळगे यांना सर्वाधिक ६ लाख ९ हजार २१ मते मिळाली. तसेच भारतीय जनता पार्टीचे सुधाकर तुकाराम श्रंगारे यांना ५ लाख ४७ हजार १४० मते मिळाली. त्यामुळे डॉ. काळगे हे ६१ हजार ८८१ मताधिक्याने विजयी झाले.




## रिपब्लिकन सेना, सरसेनानी : आनंदराज आंबेडकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक: ०२ जुन २०२४ रोजी रिपब्लिकन सेना, सरसेनानी : आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रिपब्लिकन सेना नवी मुंबई युवा अध्यक्ष : आयु. अमोल पटेकर यांच्या जुईनगर नवी मुंबई येथील नवीन वास्तू ग्रहप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी प्रमुख उपस्थितीत मान. आनंदराज आंबेडकर यांच्या शुभ हस्ते रिबिन फित कापुन व त्याच क्षणी साहेबांचा वाढदिवस साजरा करण्यात अला. आहे कुणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला..! केकप्रतीकृती साकारून साहेब दिल्लीच्या संसद भवनात विराजमान होऊन समाजाची व देशाची सेवा करोत त्यांच्या पुढील मंगलकार्यास मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे विधीसंकलन बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी पार पाडले.





# लातूर कृषि महाविद्यालय परिसरातील ४ एकरावर साकारणार मियावाकी जंगल

**जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वृक्ष लागवडीस प्रारंभ सामाजिक वनीकरण विभाग, कृषि महाविद्यालयाचा उपक्रम**



लातूर :- येथील लातूर कृषि महाविद्यालयाच्या ४ एकर जागेवर सामाजिक वनीकरण विभागाच्यावतीने मियावाकी स्वरुपाचे जंगल साकारले जाणार आहे. पर्यावरण दिनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून या उपक्रमास प्रारंभ झाला. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिव्याख्याता तथा प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अमितराज जाधव, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, लातूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या. कृषि महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग आणि कृषि महाविद्यालयाने संयुक्त उपक्रम हाती घेतला असून या अंतर्गत ४ एकर जागेवर सुमारे ४८ हजार झाडे लावली जाणार आहेत. मियावाकी पद्धतीने साकारण्यात येणाऱ्या या जंगलात प्रति चौरस मीटरमध्ये ३ वृक्ष लावले जातील. यामध्ये विविध ५०० प्रजातींच्या वृक्षांचा समावेश राहील. या कामाला पर्यावरण दिनापासून सुरुवात करण्यात आली. पहिल्या टप्प्यात १ एकर परिसरात वृक्षारोपणाची पूर्वतयारी करण्यात आली आहे. याठिकाणी सुमारे १२ हजार झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कृषि महाविद्यालयाच्या प्रियदर्शनी मुलींचे वसतिगृह परिसरातही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सागर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

**कृषि महाविद्यालयाने वृक्ष लागवडीचा अभिनव पॅटर्न निर्माण करावा : जिल्हाधिकारी**

कृषि महाविद्यालयात शिकणारा विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे नाते थेट निसर्गाशी जोडलेले असते. शेतीशी निगडीत असणारा अभ्यास हा निसर्गाशी निगडीत असतो. कोणत्या वृक्षाची वाढ कशी होईल, कोणत्या जमिनीवर कोणते झाड जगेल, याबाबत कृषि विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक चांगली माहिती असते. त्यामुळे कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनव संकल्पना वापरून, अभ्यासाचा उपयोग करून महाविद्यालय परिसरातील, वसतिगृह परिसरातील मोकळ्या जागेत वृक्ष लागवड करावी. यामाध्यमातून वृक्ष लागवडीचा अभिनव पॅटर्न निर्माण करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी विद्यार्थ्यांसाठी संवाद साधताना केले.

**एक विद्यार्थी-एक वृक्ष उपक्रम राबवावा : मुख्य कार्यकारी अधिकारी**

लातूर कृषि महाविद्यालयात शिकणाऱ्या विशेषतः येथील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार घ्यावा. महाविद्यालयाने एक विद्यार्थी-एक वृक्ष मोहीम राबवून वृक्ष लागवडीला प्रोत्साहन द्यावे. वृक्ष संगोपनाला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करावे. वसतिगृह परिसरातील वृक्ष लागवडीची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घेवून आपल्या शिक्षणाच्या काळात या वृक्षाची जोपासना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE